# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०५/०२/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत सावरगाव ते येणीकोणी रोड सावंगी शिवार येथे फिर्यादी नामे— अभय मधूसूदन अग्रवाल, वय ४८ वर्ष, रा. प्लॉट नं ८६ रामदास पेठ कॅनाल रोड, नागपूर हे आपल्या फार्महाउस मध्ये ऑरगॅनिक शेती करतात व कधी कधी परिवारासह तेथे येवून राहतात. तसेच मजुरांच्या मजुरीचे पैसे ते तेथेच फार्महाउसच्या लाकडाच्या कपाटात लॉकरमध्ये ठेवतात. त्यांनी फार्महाउसवर देखरेख साफसफाई करीता नौकर आरोपी नामे— दिपक उमेश यादव यास ठेवले व काही कामासाठी जाणे येणेकरीता ॲक्टीवा मोपेड गाडी क्र. एमएच ३१/एफसी ७०४७ ही ठेवली होती. दिनांक ०४/०२/२०२२ चे ०३:०० वा ते १०:३० वा. दरम्यान फार्महाउसवर येवून बघितले असता बेडरूम मधील कपाट तुटलेले दिसले. त्यामध्ये लोखंडी लॉकर दिसले नाही व त्यामध्ये ठेवलेले २०,०००/—रू. पण दिसले नाही. नमूद ॲक्टीवा गाडी पण दिसली नाही. दिपक उमेश यादव यास फोन केला असता त्याचा फोन बंद आहे. यावरून नमूद नौकर दिपक यादव याने ॲक्टीवा गाडी कि. ५०,०००/—रू. व लॉकर मधील नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. ७०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३८१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील जानकी नगर काटोल येथे दिनांक ०३/०२/२०२२ चे २२:३० वा ते दिनांक ०४/०२/२०२२ चे ०७:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनिषा रामकृष्ण मरसकोल्हे, वय ४१ वर्ष, रा. प्लॉट नं १०९, हनुमान मंदीर जवळ जानकी नगर, काटोल यांनी आपली स्विट मारूती कार घरासमोर उभी करून ठेवली होती. रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची पांढऱ्या रंगाची स्विट मारूती कंपनीची चार किंमती ५,९०,०००/—रू. रूपयाची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा वाईटोला, रामटेक येथे दिनांक ०३/२/२०२२ चे १७:०० ते १७:१५ वा. दरम्यान एमएच–४०/सीडी– ४८६८ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणाऱ्या एमएच– ५०/एमयु– ४६०५ क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– मो. साजिद मो. आबित वय २६ वर्षे रा.कहारी मोहल्ला वार्ड क्र. १० जि. बालाघाट (एम.पी) हा जागीच मरण पावला व मोटरसायकल वर मागे बसनारा मो. अरशद मो. अत्तउल्लाह खान, वय २८ वषे हा गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि श्री संजय तिवारी पोस्टे रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३३५,३०४(अ) भादवि सहक १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गजानन ऊकेबोंद्रे मो. नं. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०१ कि मी अंतरावर मौजा बुटीबोरी येथे माहे डिसेंबर २०२१ ते दिनांक २१/०१/२०२२ दरम्यान फिर्यादी नामे– राकेश प्रभु कोटांगले वय ३० वर्ष, रा. वाढवणा ता नागभिड जि चंद्रपुर ह मु बुटीबोरी यांना आरोपी १. माही सिंग, २) रिया शर्मा व २ अज्ञात आरोपी यांनी संगणमत करून प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना कार्यालय दिल्ली येथुन बोलत असल्याचे सांगून तीन लाख रूपयाचे कमी व्याजदरावर लोन मिळवून देतो असे फोन वरून बोलून प्रोसेसिग फीस. लोन टॅक्स व इन्शुरन्स अशा वेगवेगळया कारणासाठी पैश्याची मागणी केली. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचे गुगल पे व पेटीएम अकाउंट वरून एकुण १,३६,०९५/–रू. घेउन लोन मिळवून न देता फिर्यादीची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. सहकलम ६६ माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री पाटील पोस्टे बुटीबोरी मो नं ८८८८८२०६९० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**